# आदेश निशाणी 5 खाली

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश 39 नियम 1 व 2 अन्वये केलेला आहे.

2) वादींनी मनाई हुकुमाचा दावा दाखल केला आहे. सदरील दाव्यातील कथनानुसार वादी हे साकोरा, ता. नांदगांव, जि. नाशिक येथील गट नं. 1164 मधील क्षेत्र 37 आर पोट खराब 25.14 आर या क्षेत्राचे मालक व कब्जेदार आहेत. वादींच्या कथनानुसार सदरील मिळकत ही त्यांची वडीलोपार्जित मिळकत आहे. ते मालकी हक्काने ताबेदार असून वाद मिळकत प्रत्यक्ष त्यांच्या वहीवाटीत आहे. वाद मिळकतीत त्यांचे सामान ठेवण्यासाठी झाप केलेली आहे. प्रतिवादींचा वाद मिळकतीशी काही एक हक्क संबंध नाही. ते बळाच्या जोरावर त्यांच्या शांततामय कब्जेवहीवटीस हरकत अडथळा करीत आहे. करीता मनाई हुकुमचा प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

3) प्रतिवादींनी निशाणी 16 वर निशाणी 5 च्या अर्जास म्हणणे दाखल केले. त्यांनी वाद पत्रातील त्यांच्या हक्कास बाधा आणणारा संपुर्ण मजकुर नाकारला आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार वाद मिळकतीत वादी नं. 1 ते 3 यांचे आजोबा व वादी नं. 4 चे पंजोबा नामे गोविंद व प्रतिवादी नं. 1 ते 6 यांचे पंजोबा व प्रतिवादी नं. 7 चे आजोबा नामे महादु खंडु मेहतरे यांनी 03

जानेवारी 1923 रोजी संयुक्तरीत्या खरेदीखत केलेले आहे. वाद मिळकत ही 1972 पुर्वी पासून त्यांच्या लेखी कैफियत व म्हणणेसोबत दाखल केलेल्या परिशिष्टात दाखविलेल्या परिस्थितीनुसार त्यांच्या ताब्यात आहे. करीता प्रतिवादींचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली.

4) उभय पक्षातर्फे करण्यात आलेला युक्तीवाद तसेच दोन्ही पक्षाचे कथन लक्षात घेता खालील मुद्दे विचाराधीन आहेत.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1] | Whether plaintiffs have a prima facie case in their favour ?<br>वादींनी त्यांच्या हक्कात सत्कृत दर्शनी केस असल्याचे सिध्द केले आहे काय ? | ..नाही |
| 2] | Whether the balance of convenience lies in favour of the plaintiffs ?<br>न्याय समतोल वादींच्या हक्कात आहे काय ? | ..नाही |
| 3] | Whether irreparable loss would cause to the plaintiffs if the T. I. is rejected ?<br>वादींचे कधीही भरून न येणारे नुकसान होईल काय ? | ..नाही |
| 4] | What order ?<br>काय आदेश ? | ..अंतिम आदेशा प्रमाणे |

## कारणमिमांसा

5) <u>मुद्दे क्र. 1 ते 3 वरील निष्कर्षाची कारणे</u> :– वादी तर्फे विधीज्ञ श्री बी. आर. चौधरी यांनी युक्तीवाद केला की, वाद मिळकत गट नं. 1164 च्या

7/12 च्या उतारावर मालकी व ताब्याच्या रकान्यात वादींचे नावे आहेत. सदरील 7/12 निशाणी 3 सोबत दाखल केला आहे. या व्यतीरीक्त वादींनी निशाणी 26 वर वाद मिळकती संदर्भातील नोंदीच्या झेराक्स प्रत दाखल केल्या आहेत. वाद मिळकती संदर्भातील 7/12 वरील मालकी व ताब्याच्या रकान्यात वादींचे नावे असल्याने वादींचा वाद मिळकतीत ताबा असल्याचे प्राथमिक दृष्टया सिध्द होते.

6) वादी तर्फे विधीज्ञ श्री बी. आर. चौधरी यांनी पुढे युक्तीवाद केला की, पुर्वीचा वाद मिळकतीचा सर्व्हे नं. 439 वाटपानुसार 439/1 व 439/2 असे भाग पडले. यासंदर्भात नोंद नं. 535 ची छायांकीत प्रत दाखल करण्यात आली आहे. याचे अवलोकन केले असता 439/1 ही मिळकत वादींचे पुर्वज गोविंद धोंडी मेहतरे यांचे नावे असून 439/2 प्रतिवादींचे पुर्वज महादु खंडू मेहतरे यांचे नावे दिसून येते. वादींच्या वकीलांच्या म्हणण्यानुसार गट नं. 1165 हा सर्व्हे नं. 439/1 मधुन झालेला आहे. सदरील मिळकत ही वादींना वारस हक्कांने मिळाल्याची पुष्टी मिळते.

7) उलटपक्षी प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री व्ही. जी. रींढे यांनी युक्तीवाद केला की, वाद मिळकत ही प्रतिवादींच्या ताब्यात 1972 पुर्वी पासून आहे. वाद मिळकत ही वादी व प्रतिवादींचे पुर्वज यांनी संयुक्तरीत्या खरेदी केलेली होती. 2011 पर्यंत 7/12 च्या उतारामध्ये वाद मिळकतीचे पुर्वीचे मालक नामदेव, धना, आनंदा व गोविंदा यांच्या नावाची नोंद होती. विधीज्ञ श्री व्ही.

जी. रींढे यांनी गांव नमुना 6ड मध्ये खरेदी शर्त नुसार वादीं व प्रतिवादींचे पुर्वज असून गोविंद धोंडी मेहेतरे यांच्या नावाची नोंद झाल्याचा युक्तीवाद केला. प्रतिवादींतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला आहे की वादीं हे वाद मिळकतीचे मालक असल्यासंदर्भात सत्कृत दर्शनी कुठलाही पुरावा दाखल केलेला नाही.

8) उभयपक्षातर्फे केलेला युक्तीवाद ऐकला, निशाणी 5 वरील अर्ज व निशाणी 16 वर प्रतिवादींतर्फे दाखल करण्यात आलेले म्हणणे व कागदपत्राचे अवलोकन केले वादींच्या कथनानुसार वाद मिळकत ही त्यांची वडीलोपार्जित मिळकत असून वादी हे मालक व कब्जेदार असल्याचे कथन केले आहे. वादींच्या कथनानुसार तत्काळ मोजणीचा अर्ज संबंधीत कार्यालयात दिला होता. परंतु प्रतिवादींनी 18 व 19 ऑगष्टला प्रत्यक्षात मोजणी होऊ दिली नाही. परंतु प्रतिवादींतर्फे उप अधिक्षक भूमि अभिलेख, नांदगांव यांच्या कार्यालयात वादी नं. 2 रावसाहेब नामदेव सुरसे यांनी अर्ज केला की, वाद मिळकतीमध्ये उभे पीक असल्याने 07/09/2012 मधील मोजणी न करता सदरील मोजणी नोव्हेंबर महिन्यात करावी असा अर्ज दिला आहे. या व्यतीरीक्त दिनांक 07/09/2012 रोजी जागा मोक्यावर जाऊन मोजणी अधिकारी यांनी पंचनामा केला त्यावेळी वाद मिळकतीत उभी पीके असल्या कारणाने मोजणी केली नाही असा पंचनामा करण्यात आला आहे. यावरून सत्कृत दर्शनी प्रतिवादींनी 18 व 19 ऑगस्ट 2012 रोजी मोजणी कामी हरकत अडथळा केला याबाबीमध्ये तथ्य राहत नाही. वादींतर्फे गोविंद धोंडी

मेहतरे व महादु खंडू मेहतरे यांचे संयुक्तरीत्या खरेदी खत झाले होते या बाबींचा दाव्यात उल्लेख केला नाही. फक्त वाद मिळकत ही वादींची वडीलोपार्जित मिळकत असल्याचा उल्लेख केला आहे. तसेच सर्व्हे नं. 439/1 चा गट नं. 1164 झाला असा सत्कृत दर्शनी कुठलाही पुरावा न्यायालयासमोर सादर केला नाही. प्रतिवादींतर्फे खरेदी खताची छायांकित प्रत दाखल करण्यात आली तसेच गांव नमुना 6ड मध्ये व वादींतर्फे निशाणी 26 नोंद नं. 535 दाखल करण्यात आले आहे यावरून मुळ सर्व्हे नं. 439 हा वादीं व प्रतिवादींच्या पुर्वाजांनी संयुक्तरीत्या घेतला होता हे सत्कृत दर्शनी सिध्द होते. परंतु या महत्वपुर्ण बाबी न्यायालयासमोर वादींनी आणलेल्या नाही. वादीं हे न्यायालयात सद्हेतुने आलेले सत्कृत दर्शनी दिसत नाही. करीता वादीं हे तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यास पात्र नाही. या अनुषंगाने मुद्दे क्र. 1 ते 3 निष्कर्ष येणेप्रमाणे नोंदवुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

<u>आदेश</u>

1) अर्ज खर्चासह खारीज करण्यात येतो.

स्थळ : नांदगांव (रा. उ. नागरगोजे)
दिनांक : 24/04/2013 दिवाणी न्यायाधीश क. स्तर, नांदगांव